पुण्यनगरी



कोल्हापूर : उत्कृष्ट महाविद्यालयाचा पुरस्कार स्वीकारताना शिवराज महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एम. कदम. उपस्थित अन्य.

# 'शिवराज'चा उत्कृष्ट महाविद्यालय म्हणून गौरव

**गडहिंग्लज :** राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यातील भरीव योगदानाबद्दल जिल्ह्यातील उत्कृष्ट महाविद्यालय म्हणून येथील शिवराज महाविद्यालयाचा गौरव करण्यात आला. तसेच उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी म्हणून एनएसएसचे कार्यक्रम अधिकारी प्रा. दीपक खेडकर यांनाही गौरवण्यात आले. शिवाजी विद्यापीठ येथे आयोजित कार्यक्रमात हा सन्मान करण्यात आला. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते प्राचार्य डॉ. एस. एम. कदम, प्रा. दीपक खेडकर, डॉ. जी. जी. गायकवाड यांनी हा सन्मान स्वीकारला. एनएसएस विभागाच्या वतीने राबवलेल्या विविध उपक्रमांना संस्थेचे अध्यक्ष प्रा. किसनराव कुराडे, सचिव डॉ. अनिलराव कुराडे, उपाध्यक्ष ॲड. दिग्विजय कुराडे यांचे मार्गदर्शन लाभले.

सकाळ




**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात प्रा. किसनराव कुराडे-पाटील लिखित दहा पुस्तकांचे प्रकाशन शनिवारी झाले. प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. शोभा पवार, प्रा. किसनराव कुराडे- पाटील, युवराज कदम, डॉ. प्रतिभा देसाई आदी.

# प्रा. कुराडे लिखित पुस्तकांचे 'बेटी बचाओ'साठी भरीव योगदान

## कुलगुरू डॉ. शिर्के : शिवाजी विद्यापीठात दहा पुस्तकांचे प्रकाशन

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ७ : प्रा. किसनराव कुराडे लिखित पुस्तकांच्या माध्यमातून 'बेटी बचाओ अभियान' प्रभावीपणे राबविण्यासाठी खऱ्या अर्थाने योगदान मिळाले असल्याचे गौरवोद्गार शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी काढले. या पुस्तकांच्या माध्यमातून ही लोकचळवळ केवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर देशपातळीवर पोहोचेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

प्रा. कुराडे लिखित 'चिंगीचा माईंडसेट', 'भ्रूणकन्येचा आत्मध्वनी', 'चिंगीची भरारी', 'बिटिया का जीवनदान पत्र' आदी पुस्तकांचे आज शिवाजी विद्यापीठात प्रकाशन झाले. बेटी बचाव अभियान, विद्यार्थी विकास विभाग (शिवाजी विद्यापीठ), शिवराज विद्या संकुल व वाचनकट्टा बहुउद्देशीय संस्थेच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम झाला. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, प्रा. किसनराव कुराडे, प्राचार्य डॉ. एस. एम. कदम, वाचनकट्टाचे अध्यक्ष युवराज कदम यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमात शिवाजी विद्यापीठ अंतर्गत महाविद्यालयांच्या ग्रंथालयांना प्रातिनिधिक स्वरूपात प्रा. कुराडे यांनी लिहिलेल्या दहा पुस्तकांचा संच भेट देण्यात आला.

प्रा. कुराडे म्हणाले, 'साठ वर्षांपूर्वी विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार व व्ही. टी. पाटील यांच्या सान्निध्यात जडणघडण झाली. कमवा व शिका योजनेतून शिक्षण झाले. आप्पासाहेब पवार यांच्या पालकत्वामुळे शिक्षण पूर्ण होऊ शकले.' बेटी बचाओ अभियानाच्या समन्वयिका डॉ. प्रतिभा देसाई यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाला प्रा. जी. पी. माळी, हसन देसाई, सिध्दार्थ लाटकर, श्याम कुरळे, डॉ. सुनील देसाई, ॲड. दिग्विजय कुराडे, बसवराज आजरी, एम.डी. देसाई, ईश्वर देसाई, मोहन कवटेकर, समाजशास्त्र अधिविभाप्रमुख डॉ. प्रतिमा पवार, डॉ. माधुरी वाळवेकर, डॉ. ज्योती जाधव आदी उपस्थित होते. उज्वला पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

- 8 OCT 2023
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आंतरविभागीय बास्केटबॉलमध्ये 'केआयटी'चा महिला संघ तृतीय

**सकाळ वृत्तसेवा**


कंदलगाव, ता. ७ : केआयटी अभियांत्रिकी (स्वायत्त) महाविद्यालयाच्या महिला संघाने शिवाजी विद्यापीठस्तरीय आंतरविभागीय महिला बास्केटबॉल स्पर्धेमध्ये तृतीय स्थान मिळवले. या स्पर्धा सांगली जिल्ह्यातील एम.बी.एस.के.कन्या महाविद्यालय, कडेगाव येथे झाल्या.

या संघात रिचाली काशीद, निधी मुसळे, साक्षी कुलकर्णी, शिवांजली पाटील, विशाखा ननावरे व श्वेता बंकापुरे यांचा समावेश होता. संस्थेचे संचालक डॉ. मोहन वनरोट्टी, डॉ. मनोज मुजुमदार यांच्या हस्ते विजेत्या संघाचा सत्कार करण्यात आला. संस्थेचे शारीरिक शिक्षण संचालक प्रा. विजय रोकडे यांचे सहकार्य व मार्गदर्शन संघाला लाभले.



**कंदलगाव :** आंतरविभागीय बास्केटबॉल स्पर्धेत तृतीय स्थान मिळवलेल्या केआयटीच्या महिला बास्केटबॉल संघाचा सत्कार करण्यात आला. या वेळी डावीकडून प्रा. विजय रोकडे, संचालक डॉ. मोहन वनरोट्टी, डॉ. मनोज मुजुमदार आदी उपस्थित होते.

तरुण भारत



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात 'कन्झर्व्हिंग वाइल्डलाइफ टूगेदर' या ग्रंथाचे प्रकाशन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. माधव भिलावे, डॉ. सुनील कोळी, विश्वास देशपांडे आदी.

# हव्यासाला आळा न घातल्यास भावी पिढ्या नैराश्यात जाईल

प्रतिनिधी
कोल्हापूर

- कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे मत

मानवाने वेळीच आपल्या हव्यासाला आळा घातला नाही, तर पुढच्या पिढ्या नैराश्याच्या खाईत लोटल्या जातील, असे मत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र अधिविभागातील डॉ. माधव भिलावे आणि डॉ. सुनील कोळी यांनी संपादित केलेल्या 'कन्झर्व्हिंग वाइल्ड लाइफ टूगेदर' या ग्रंथाचे वन्यजीव सप्ताहानिमित्त कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. याप्रसंगी ते बोलत होते. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, निसर्गात मानवाने सातत्याने हस्तक्षेप केला आहे. जगण्याच्या गरजा मर्यादित असल्या तरी निसर्गाची अधिकाधिक हानी केली आहे. गरज आणि हव्यासामधील सीमारेषा त्याने कधीच ओलांडली आहे. त्यामुळेच पाणी, जमीन आदी पर्यावरणीय घटक वाचविण्याबरोबरच अगदी प्राणी, वनस्पती वाचविण्यासाठीही जागृती करण्याची वेळ आली आहे. 'लेक वाचवा' अभियानातून आपल्या प्रजातीला वाचविण्यासाठी धडपड करण्याची वेळ मानवावर आली आहे. डॉ. भिलावे यांनी या पुस्तकाद्वारे वन्यजीवांना वाचविण्यासाठी आवश्यक असलेल्या प्रयत्नांचा ऊहापोह केलेला आहे. कुलसचिव डॉ. शिंदे म्हणाले, आपल्या स्वार्थापायी जैवविविधता नष्ट करत चाललो आहोत, हे थांबविले पाहिजे. वन्यजीव विपरित वागत आहेत, याची कारणे मानवाने वर्तनामध्ये शोधणे आवश्यक आहे. मानवतेसमोर कृत्रिम बुद्धिमत्तेसारखी अनेक आव्हाने उभी ठाकत आहेत. त्यांच्या अनुषंगाने आपल्याला मानवी भवितव्याविषयी खूप काही करण्याची गरज आहे. डॉ. भिलावे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. राहुल तायडे यांनी आभार मानले.

तरुण भारत

# भगवान महावीर अध्यासनाला २५ हजार रुपयांची देणगी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील भगवान महावीर अध्यासनाच्या प्रस्तावित वास्तूकरीता दक्षिण भारत जैन सभा पदवीधर संघटनेचे सल्लागार सदस्य प्रा. एस. डी. आकोळे व सचिव बी. बी. शेंडगे यांनी २५ हजार रुपयांची देणगी दिली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील व कुलसचिव व्ही. एन. शिंदे व वित्त व लेखा अधिकारी डॉ. सुहासिनी पाटील यांनी आभार मानले. अध्यासनाच्या इमारत बांधकामास दानशूर व्यक्ती व संस्थांनी मदत करावी, असे आवाहन डॉ. विजय ककडे यांनी केले.

तरूण भारत

# शिवाजी विद्यापीठातील उन्हाळी सत्राचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च/एप्रिल–२०२३ उन्हाळी सत्रातील आठ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात आले. यामध्ये बीएड, एमएड इंटिग्रेटेड सेमी १ ते ६, बीफार्मसी सेमी १ व २ या परिक्षांच्या निकालाचा समावेश आहे. आज अखेर ६७८ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात आले आहेत.